**तातडीचे व महत्वाचे**

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ द्वारा संचालित विद्यापीठ)

(सामान्य प्रशासन)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.
दूरध्वनी क्रमांकः कार्यालय : ०७१२–२५२२९११, फॅक्स : ०७१२–२५५५७०१

क्रमांकः रातुमनावि/साप्र/स/२४७८
दिनांकः १६ जानेवारी २०१७

प्रति,

विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या
सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य.

विषयः 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण (प्रतिबंध मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३ या कायद्याबद्दल प्राचार्य व महाविद्यालयातील अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती सदस्यांची जाणीव जागृती कार्यशाळा.

संदर्भः श्रीमती विजया रहाटकर, अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांचे दिनांक ५ जानेवारी २०१७ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

आपणास कळविण्यात येते की, मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या 'विशाखा मार्गदर्शक तत्वे' अनुसार कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण (प्रतिबंध मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३ या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी तसेच कायद्याबद्दल जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने संदर्भिय पत्रास अनुसरून **विद्यापीठाचे गुरूनानक भवन, अंबाझरी मार्ग, नागपूर येथे शनिवार, दिनांक २८ जानेवारी २०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता** कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यशाळेचे उद्घाटन श्रीमती विजया रहाटकर, अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य महिला आयोग ह्या करतील. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. डॉ. सिध्दार्थविनायक काणे, कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ हे भूषवतील, तसेच प्र–कुलगुरू मा. डॉ. प्रमोद येवले यांची प्रमुख उपस्थिती राहील. सदर कार्यक्रमाची कार्यक्रमपत्रिका आपणास नंतर पाठविण्यात येईल. संदर्भिय पत्रानुसार सदर कार्यशाळेसाठी विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील प्रत्येक महाविद्यालयाचे प्राचार्य व अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती (ICC) च्या दोन प्रतिनिधींना उपस्थित राहावयाचे आहे.

करिता आपणास विनंती करण्यात येते की, उपरोक्त आयोजित कार्यशाळेसाठी आपण स्वतः नियोजित स्थळी सकाळी ९.३० वाजता नोंदणीस्तव उपस्थित राहावे आणि आपल्या महाविद्यालयातील अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती (ICC) च्या दोन प्रतिनिधींना देखील उपस्थित राहण्याबाबत आपल्या स्तरावर कळवावे. तसेच याबाबत आपली व अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती (ICC) च्या दोन प्रतिनिधींची माहिती खालील प्रपत्रात नमूद करून कार्यक्रम संयोजक डॉ. धम्मसंगिनी रमागोरख, संचालक, महिला अध्ययन विकास केन्द्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्या **dhmmasangini@gmail.com** या ई–मेल आयडीवर किंवा ९४०५४२८५११ या भ्रमणध्वनीवर संदेशाद्वारे दिनांक २१ जानेवारी २०१७ पर्यत किंवा तत्पूर्वी पाठवावी. प्रवास खर्च महाविद्यालयांना करावयाचा आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

| अ.क्र. | नाव, पद व महाविद्यालयाचे नाव | दुरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक | ई–मेल |
|---|---|---|---|
| | | | |

आपला

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव

प्रतिलिपी माहितीस्तवः
श्रीमती विजया रहाटकर, अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग), कलानगर, पोटमाळा, वांद्रे (पूर्व) मुंबई– ४०००५१.